मुलाखत :
प्रमोद चौधरी

प्रयत्न व नावीन्य हेच यशाचे मंत्र

हरित तंत्रज्ञानाची कास धरत प्राज इंडस्ट्रीजने देशविदेशांत या तंत्रज्ञानाचा प्रसार करत जैवइंधनाची निर्मिती, पाण्याचा प्रभावी वापर, सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रमोद चौधरी यांनी याच हरित तंत्रज्ञानाच्या साह्याने कृषिकचऱ्याचा वापर करून जैवऊर्जा निर्मिती कशी करता येईल यावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले आहे. महाराष्ट्र कॉर्पोरेट एक्सलन्स अॅवॉर्ड, अर्थात मॅक्सेल पुरस्कार सोहळ्यात यंदा त्यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या निमित्ताने प्रमोद चौधरी यांच्याशी केलेली बातचीत...



■ आयआयटीमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंग केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा, असं केव्हा वाटलं? हा व्यवसाय कृषिआधारितच असावा, अशी काही खूणगाठ मनाशी बांधली होती का?

आयआयटीत असतानाच ठरवलं होतं की आठ-दहा वर्षं नोकरी करायची आणि मग स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा. त्यानुसार १९८४ मध्ये स्वतःचा उद्योग सुरू करायचा, असं मनाशी पक्कं केलं. त्यापूर्वी बजाज टेम्पोमध्ये मी नोकरी केली. सात वर्षं एका जर्मन कंपनीत काम केलं. पहिल्यापासून माझ्यात नेतृत्वगुण होते. त्यामुळे आपण काही तरी निर्माण करावं, त्यात लोकांना सामावून घ्यावं, लोकांना योगदान देण्याची संधी आपण उपलब्ध करून द्यावी, हेदेखील मनात पक्कं होतं. शिवाय मी ग्रामीण भागातून आलेलो असल्यानं शेतीशी माझी पक्की नाळ जोडलेली होती. माझं प्राथमिक शिक्षण नगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यात कोळपेवाडी इथं झालं. पुढे मग पुण्यात शिक्षण झालं. शेवटी मी मुंबई आयआयटीत आलो. अशी माझी पार्श्वभूमी असल्यामुळे मला शेती आणि शेतीचं वातावरण यांची माहिती होती. माझ्या गावचा परिसर हा साखर कारखान्याचा होता त्यामुळे तिथलं कामकाज आणि त्या परिसराच्या उद्योगविषयक, तंत्रज्ञानविषयक गरजांची मला कल्पना होती. स्वतः उद्योजक बनताना ही सगळी परिस्थिती माझ्यासमोर होती.

मी लहानपणापासून साखर कारखाना ही व्यवस्था पाहात आलोय. साखर कारखाने गावात वसलेले असतात. कारखान्याला केंद्रस्थानी ठेवून मग त्या त्या भागाचा विकास होतो; परंतु २५-३० वर्षांपूर्वी शुगर फॅक्टरी ही काही मेनस्ट्रिम ईंडस्ट्री नव्हती. त्यामुळे त्यांच्यापर्यंत चांगलं तंत्रज्ञान बऱ्याचदा सहजी पोहोचत नाही, असं माझं निरीक्षण होतं; मग या लोकांना आधुनिक तंत्रज्ञान देऊन, व्यवस्थापनाच्या आधुनिक कल्पना देऊन त्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी काही हातभार लावता येईल का, हा खरा माझा त्या वेळी उद्देश होता.

■ हरित तंत्रज्ञान अर्थात ग्रीन टेक्नॉलॉजीवर तुमचा सर्वाधिक भर व विश्वास आहे. हरित तंत्रज्ञानाचा अंगिकार करण्याची प्रेरणा कुठून मिळाली?

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात यासंदर्भात विचार करायला सुरुवात केली. या तंत्रज्ञानाविषयी आधी थोडीफार कल्पना होती, उत्सुकताही होती; परंतु त्याला खऱ्या अर्थानं बाळसं धरलं १९९५ मध्ये. त्या वेळी लोकांचं लक्ष पर्यावरणाकडे जायला लागलं होतं. एकंदर पर्यावरणाविषयी जागरूकता वाढण्याचा तो काळ होता. पर्यावरणानुकूल इंधनांचा विचार करायचा झाल्यास इथेनॉल हा उत्तम पर्याय असल्याचं ऐकलं होतं, त्याविषयी थोडंफार वाचलंही होतं. त्या वेळी इथेनॉल म्हणजे केवळ ऊर्जेचा स्रोत इतकंच माहीत होतं; परंतु ते पर्यावरणासाठीही पोषक आहे हे वाचनातून कळलं.

प्रेरणेचं म्हणाल तर साखर कारखान्यांपासून मला प्रेरणा मिळाली, असं म्हटलं तर ते अतिशयोक्त होणार नाही. कारण साखर कारखान्यांना आधुनिक तंत्रज्ञान कसं देता येईल आणि साखरेच्या प्रक्रियेत तयार होणाऱ्या मळीपासून उपयुक्त व आर्थिकदृष्ट्या परवडणारे उपपदार्थ कसे तयार करता येतील, यावर मी लक्ष केंद्रित केलं. त्या वेळी साखर कारखान्यांतून तयार होणारं अल्कोहोल हे केवळ मद्यार्क व्यवसायात वापरलं जात असे; परंतु अल्कोहोल हा एक चांगला ऊर्जास्रोत असून त्याला भावी काळात महत्त्व प्राप्त होईल, याचा अंदाजही आला होता, याचं कारण ब्राझील व अमेरिकेत अल्कोहोलचा तसा वापर करायला सुरुवात झाली होती. हा सगळा विचार किंवा एक प्रकारे गृहपाठ पक्का करत १९९५ मध्ये त्याचं प्रकल्पात रूपांतर झालं.

■ इथेनॉल तयार करताना ते केवळ उसाच्या मळीपासून न करता अन्य घटकांपासूनही करावं, असे प्रयत्न तुम्ही केलेत. ते नेमके काय होते?

पारंपरिकदृष्ट्या इथेनॉल हे उसाच्या मळीपासून तयार करतात. तसंच ते पिष्टमय पदार्थांपासून तयार करतात. अमेरिकेत तर इथेनॉलची निर्मिती ही सर्रास धान्यापासून केली जाते. मध्यंतरीच्या काळात मी हार्वर्ड विद्यापीठातही ट्रेनिंग घेऊन आलो. या सगळ्या प्रवासात इथेनॉल तयार करण्यासाठीचं तंत्रज्ञान हे भारतीयच असावं, याचा मात्र मी प्रथमपासून आग्रह धरला. आपल्याजवळ जे ज्ञान आहे त्याचा वापर करूनच तंत्रज्ञान निर्माण करता यायला हवं, यावर मी भर दिला. १९९० च्या दशकात जे खुल्या अर्थव्यवस्थेचं वारं वाहू लागलं, त्यानं माझ्या या विचारासाठी अनुकूल वातावरण निर्माण केलं.

■ ही सगळी वाटचाल सुरू असताना व्यवसायासाठी कोणती तत्त्वं पाळलीत? किंवा नेमका व्यवसाय कसा करायचा, याची कोणती खूणगाठ मनाशी बांधलीत?

माझ्या दृष्टीनं माणूस हेच माझं महत्त्वाचं भांडवल आहे. पैसे काय आज आहेत, तर उद्या नाहीत. त्यामुळे हाती गवसलेला प्रत्येक माणूस महत्त्वाचा आहे, असं मानूनच प्राज इंडस्ट्रीजची वाटचाल सुरू आहे. ही वाटचाल करताना मग आपल्या व्यवसायात एक्सलन्स कसा आणता येईल, हे पाहण्याचा प्रयत्न केला. कारण आणखी एक कंपनी अशा स्वरूपात व्यवसाय करण्यात मला मुळीच रस नव्हता. माणूस हेच भांडवल, एक्सलन्सचा आग्रह या दोन तत्त्वांनंतरचं महत्त्वाचं तत्त्व म्हणजे जोखीम पत्करून पुढे वाटचाल सुरू ठेवणं होय. म्हणूनच वेगवेगळ्या देशांमध्ये जाऊन प्राज इंडस्ट्रीजने व्यवसाय केला. असा व्यवसाय करताना सर्व घटकांची भट्टी योग्य प्रकारे जमली पाहिजे, तरच व्यवसाय होतो. त्यासाठी दैवाचाही मोठा वाटा असतो, असं मला वाटतं. अर्थव्यवस्था खुली होणं, इराक युद्धामुळे पर्यायी इंधन म्हणून इथेनॉलकडे जगाचं लक्ष जाणं आणि त्याच वेळी प्राज इंडस्ट्रीजने जगात व्यवसाय करू लागणं, हा सगळा दैवाचाच तर भाग आहे.

■ जैवइंधनाचं भविष्य काय आहे असं वाटतं?

जैवइंधनाचं किंवा इथेनॉलचं भविष्य म्हणजे जैवइंधनाकडून आपण जैवऊर्जेकडे जाणार आहोत. जैवऊर्जा हाती आल्यावर त्यातनं तुम्हाला जैवइंधन तयार करता येईल, बायोक्रिटिकल्स तयार करता येतील. झाडांची पानं सूर्याचा प्रकाश घेऊन, प्रकाश-संश्लेषण क्रियेने सौरऊर्जा साठवून ठेवतात. हीच ऊर्जा आपण पुन्हा विलग करायची आणि वापरायची. कारण पानं वाळली की ही ऊर्जा वाया जाते. याच लपलेल्या ऊर्जेचा काही भाग धान्यांच्या रूपात अन्न म्हणून सेवन केला जातो, उसासारख्या पिकापासून इथेनॉल वेगळे काढून तो इंधन म्हणून वापरला जातो, तर काही भाग कृषिकचरा (अॅग्रीवेस्ट) म्हणून वाया जातो. उदाहरणार्थ, मक्याचे दाणे काढल्यावर रिकामं कणीस हे कृषिकचरा म्हणून फेकून दिलं जातं; परंतु नकळत आपण ऊर्जेचा मोठा साठा फेकून देत आहोत, याचं भान आपल्याला रहात नाही. म्हणून आता माझा पुढचा फोकस हा कृषिकचऱ्यावर असणार आहे. इथेनॉल तयार करताना जे सांडपाणी वाया जातं त्यावर प्रक्रिया करणं हे खूप जिकिरीचं असतं. कृषिकचऱ्याप्रमाणेच हे पाणीदेखील वाया न घालवण्यासाठी प्राजने सांडपाणी शुद्धीकरण सुरू केलं. या सगळ्याची सुरुवात कुठंतरी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यापासून झाली, असं म्हणायला हरकत नाही. त्याचप्रमाणे आगामी काळात प्राज इंडस्ट्रीजचा भर हरित तंत्रज्ञानावर असेल. म्हणजे त्याकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन आम्ही विकसित करणार आहोत. उदाहरणार्थ, पॉलिएस्टरसारखे उत्पादन हरित तंत्रज्ञानाच्या साह्याने करता येतं. याचा आग्रह पुढच्या काळात आम्ही धरणार आहोत.

■ यशस्वी उद्योजक होण्यासाठी नवोदितांना तुम्ही कोणता मंत्र द्याल?

कोणताही उद्योजक कष्ट तर करतोच. त्याला पर्याय नाही; परंतु त्याचबरोबर चिकाटी महत्त्वाची आहे. प्रयत्नातलं सातत्य आणि नावीन्यपूर्णता हेदेखील महत्त्वाचे घटक आहेत. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे मल्टिटास्किंग करता आलं पाहिजे, अष्टावधानी राहून काम करता आलं पाहिजे. परदेशांत उद्योग करताना ते काहीसे सरळपणे सुरू करता येतात; परंतु आपल्याकडे १२०-१२२ परवानग्या लागतात. त्यामुळे खरं म्हणजे आपल्याला अष्टावधानी राहता आलंच पाहिजे. सर्वांत शेवटी, मी उद्योजक होणार असेन तर माझ्या मनाची तशी जडणघडण मी केली पाहिजे.

■ पर्यावरणविषयक जाणीव समाजात वाढते आहे का? तुम्ही त्यासाठी काही प्रयत्न करत आहात का?

निश्चितच. प्राज फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही वातावरणाचं संतुलन तीन स्तरांवर राखण्यासाठी प्रयत्न करतो. समाज, पर्यावरण व अर्थव्यवस्था या तीन स्तरांवर संतुलन राखणं फार गरजेचं आहे. अर्थव्यवस्थेचा मूलाधार जरी नफा असला, तरी समाज व पर्यावरण यांच्यासाठी केवळ हाच आधार असून चालणार नाही. त्यामुळे या तिन्ही घटकांमध्ये संतुलन साधण्यासाठी प्राज फाउंडेशन व प्राज इंडस्ट्रीज, त्यांचे कर्मचारी सतत झटत असतात. समाजाचं संतुलन साधलं जावं म्हणून प्राजमध्ये आम्ही मोठी महाविद्यालये, मोठ्या शिक्षण संस्था यांच्यातून मुलं कधीच भरती करत नाही. आम्ही नवीन कर्मचारी घेताना ते खेड्यातल्या शिक्षण संस्थांमधून घेतो, छोट्या महाविद्यालयांतून घेतो. या मुलांमध्ये प्रचंड क्षमता असते. त्यांना कुणीतरी संधी देण्याची गरज असते. प्राजमध्ये आम्ही ती संधी देतो. असं झालं तरच सामाजिक संतुलन साधलं जातं, अशी आम्हा सर्वांचीच पक्की धारणा आहे.

- वैभव वझे

www.vijaysales.com

46 YEARS OF SERVICE

एकदम लेटेस्ट स्मार्टफोन्स.
अगदी काल आलेले सुद्धा.